# चैतन्य लहरी

मार्च/एप्रिल २००६
अंक क्रमांक ३/४



# वाढदिवस पूजा ,सिडनी, दिनांक २१ मार्च, २००६













# अनुक्रमणिका


- जागतिक आश्रम-प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवी जन्मस्थान, छिंदवाडा ........ २
- छिंदवाडा पूजा सेमिनार- दिनांक १९,२०,२१ मार्च २००६ ........ ३
- श्री पापाजींचे भाषण (सिडनी टाऊन हॉल) दिनांक ६ फेब्रुवारी २००६ ........ ६
- पूजाविधीचे महत्व ........ ११
- ऑस्ट्रेलियाहून वृत्त ........ १२
- श्रीगणेश पूजा- १९९२ ........ १५
- कुंडलिनी ........ १८


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी व युवाद्दष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था "निर्मल इन्फोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणे" या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की ,निर्मल इंन्फोसिस्टीम् ॲण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि.या कंपनीच्या लेखी परवानगीशिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करु नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहील.

तसेच चैतन्य लहरी मराठी मासिकाचे सन २००६ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT.LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यासाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल.कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.


NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT. LTD.

BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,

KOTHRUD,PUNE 411 O29. TEL. 020 25286537

# जागतिक आश्रम
## प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवी जन्मस्थान, छिंदवाडा

आदिशक्ती प.पू.श्रीमाताजींचे पृथ्वीवरील मानव रूपातील अवतरण दिनांक २१ मार्च १९२३ साली दुपारी १२ वा. मध्यप्रदेशातील छिंदवाडा या ठिकाणी झाले. सदर श्रीमाताजींचे अवतरण झालेली वास्तू ही सहजयोग्यांच्या दृष्टीने सर्वात पवित्र स्थान आहे. सदर पवित्र स्थान हे प.पू.श्रीमाताजींच्या आशीर्वादाने कायदेशीरपणे दिनांक १५ जुलै २००५ रोजी आपल्या ताब्यात मिळाले तर प्रत्यक्षात दिनांक ५ ऑगस्ट २००५ या दिवशी ताबा घेतला.

छिंदवाडा शहरात प्रवेश करतानाच सर्वत्र व्हायब्रेशन्स जाणवू लागतात. मुख्य रोडवर श्रीमाताजींचे जन्म ठिकाण लांबून दृष्टीस पडल्याबरोबर व्हायब्रेशन्सचा प्रचंड प्रवाह वाहू लागला. सदर वास्तूच्या पुढच्या बाजूला रस्त्यावर लिंबाचे झाड आहे. आश्रमाच्या दर्शनी भागात प्रवेश करण्यासाठी वाहने आत जाण्यासाठी दोन गेट असून समोरच्या बाजूला एक लहान गेट आहे..आश्रमासमोरचे अंगण साधारण ७८ फूट x २५ फूट आहे. आश्रमाची लांबी साधारण २०० फूट असून रुंदी साधारण ७४ फूट आहे. आश्रमाचे क्षेत्रफळ अंदाजे १४०८० चौरस फूट आहे. आश्रम दोन भागात असून पुढचा भाग हा तीन पार्ट मध्ये आहे. पुढच्या बाजूला एक मोठा व्हरांडा आहे. मधल्या भागात चार हॉल + जन्म स्थान खोली + स्वयंपाक घर आहे. तर आश्रमाच्या डाव्या बाजूला मास्टर रुम +किचन+२ खोल्या + टॉयलेट तसेच उजव्या बाजूला ३ खोल्या + टॉयलेट आहे. ही मुख्य इमारत संपूर्ण कौलारू छताची आहे. या मुख्य इमारतीचा एकूण आकार अंदाजे ७८ फूट x ७४ फूट आहे. आश्रमाचा मागचा भाग हा साधारण ५० फूट x ८३ फूट आहे. त्यामध्ये ७ खोल्या (सर्वन्ट क्वार्टर्स) एक ४ रुमचा ब्लॉक (गेस्ट रुम) + ३ टॉयलेट आहेत.

आश्रमात प्रवेश केल्याबरोबर समोरच्या हॉल लगतच आदिशक्तीचे जन्मस्थान आहे. सदर जन्मस्थान सर्वबाजूनी सुंदर सजविलेले आहे. त्यामध्ये श्रीमाताजींचा मोठा फोटो गादीवर मांडलेला आहे. तसेच उजव्या बाजूला एक फोटो आहे. जन्म ठिकाणी प्रचंड व्हायब्रेशन्स जाणवत होती.

छिंदवाडा जन्म ठिकाणी जाण्यासाठी नागपूरपासून रोडने १२५ कि.मी. अंतर असून साधारण ३.५. तास वेळ लागतो. छिंदवाडा बस स्थानकापासून साधारण १.५ कि.मी. अंतर आहे. तसेच छिंदवाडा रेल्वे स्टेशनपासून ४-५ किलोमीटर अंतर आहे. आश्रमाच्या डाव्या बाजूला पोलो ग्राउंड आहे. तर उजव्या बाजूला सिटी कोतवाली स्टेशन आहे.

सदर आश्रमास श्रीमाताजींनी जागतिक आश्रम हे नाव देण्यास सांगितले होते. याची प्रचीती म्हणजे छिंदवाडा २१ मार्च २००६ रोजी झालेल्या सेमिनारमध्ये जवळजवळ १३३ परदेशी सहजयोगी जन्मठिकाण बघण्यासाठी आले होते. प्रत्येक सहजयोग्याने प.पू.श्रीमाताजींच्या जन्मठिकाणी एकदा तरी जाऊन व्हायब्रेशन्सचा आनंद घ्यावा.

जय श्रीमाताजी.


# छिंदवाडा पूजा-सेमिनार

दिनांक १९,२० व २१ मार्च २००६.

प.पू.श्रीमाताजींचे जन्म ठिकाण असलेली वास्तू आपल्या ताब्यात आल्यानंतर प्रथमच श्रीमाताजींच्या वाढदिवसाची पूजा जन्म ठिकाणी आयोजित केली होती. सेमिनारची तयारी मध्यप्रदेश, भोपाळ, इंदूर , रायपूर, नागपूर, व चंद्रपूरच्या सहजयोग्यांनी सामूहिकपणे केली होती. सेमिनारच्या मुख्य कार्यक्रमासाठी छिंदवाडामधील राणी कोठी या प्रशस्त कार्यालयात केली होती. मुख्य पेंडॉल राणी कोठीच्या लॉनवर उभारला होता. तसेच छिंदवाडामधील राजाकी बगीया, शरण मंगल कार्यालय, पटेल मंगल कार्यालय, शांतिनाथ भवन, सुमन मंगल कार्यालय, अग्रसेन भवन, पंजाब भवन, भारत भवन, या ठिकाणी येणाऱ्या सहजयोग्यांची राहण्याची व्यवस्था केली होती. सेमिनारच्या पूर्वतयारीसाठी ३/४ दिवस अगोदरपासूनच कार्यकर्ते व युवाशक्ती छिंदवाडामध्ये दाखल झाले होते.

१९, मार्च २००६

सकाळी ७.३० च्या सुमारास सामूहिक ध्यानाची सुरवात दोनभजनांनी झाली. त्यानंतर वाद्यांवर वाजविलेले सर्व चक्रांचे राग असलेली सीडी लावून त्यावर सामूहिक ध्यान घेतले. त्यानंतर सकाळी १०.०० च्या सुमारास श्रीमाताजींच्या जन्म ठिकाणापासून मिरवणूक काढण्यात आली. सुरवातीला तीन महामंत्र व गणेश अथर्वशीर्ष म्हणून मिरवणुकीस सुरुवात झाली. मिरवणुकीच्या सुरूवातीला श्रीमाताजींची प्रतिमा असलेला रथ, त्यानंतर स्पीकर असलेली सायकल रिक्षा त्याच्या माईकवर जगभरातून आलेले विदेशी सहजयोगी श्रीमाताजींची भजने गात होते. त्यानंतर सर्व सहजयोगी शिस्तीत चालत होते. सदर मिरवणूक छिंदवाड्यातील प्रमुख भागातून फिरून परत १२.०० च्या सुमारास श्रीमाताजींच्या जन्म ठिकाणी आली.



दुपारच्या भोजनानंतर कार्यक्रमाची सुरवात भजनांनी झाली. त्यामध्ये नवीन सहजयोग्यांनी भजने सादर केली. त्यानंतर चर्चा सत्रात सुरवातीला श्री राजीवजी ग्यानी यांनी -सहजयोग क्या है, ध्यान की आवश्यकता, प्रचार प्रसार, नवीन सहजयोगी तयार करण्यापूर्वी आपण आदर्श सहजयोगी असलो पाहिजे तरच नवीन चांगले सहजयोगी तयार करू शकाल, सहजयोगाला समर्पित न होता श्रीमाताजींना समर्पित होणे आवश्यक आहे, इत्यादी विषयांवर सर्वांचे लक्ष वेधले. त्यानंतर एम.पी.चे लीडर श्री योगेश लोढा यांनी मार्गदर्शन करताना अनेक विषय मांडले त्यातील महत्त्वाचा विषय म्हणजे पुढच्या वर्षी श्रीमाताजींच्या वाढदिवसापर्यंत प्रत्येकाने नवीन पाच सहजयोगी तयार करून त्यांची नावे लिहिलेले कार्ड छिंदवाडा सेमिनारमध्ये श्रीमाताजींच्या चरणावर अर्पण केले पाहिजे.

त्यानंतर भोपाळचे श्री एम.पी.कुलकर्णी यांनी सहजयोग अनुभूती, मिळालेल्या चैतन्यलहरीचा वापर, तसेच प्रत्येकाच्या हातावर चैतन्य लहरी वाढविण्यासाठी श्रीमाताजींनी सांगितलेले प्रयोग प्रत्यक्ष सगळ्यांकडून करून घेऊन सर्वांना हातांच्या बोटांवर चैतन्य लहरीचा अनुभव मिळवून दिला. त्यानंतर श्रीमती ज्योती निगम यांनी सहजयोग्यांना मार्गदर्शन केले.

संध्याकाळी ५.३० वा. पटेल मंगल कार्यालयात जागृतीचा सार्वजनिक प्रोग्राम ठेवलेला होता. त्याठिकाणी विदेशी सहजयोग्यांनी सुरवातीला स्टेजवर भजने सादर केली. त्यानंतर साधारण १००-१५० च्या समुहाला

जागृती देण्यात आली. अशा रात्री १०.०० पर्यंत अनेक बॅचेस मध्ये जागृती दिली गेली. बाजूला पेंडॉल घालून सहजयोगाच्या माहितीचे चार्ट लावले होते.

मुख्य कार्यक्रमाच्या ठिकाणी रात्री ८.३० च्या सुमारास श्री सुब्रमण्यम् यांनी राग यमन गायला.त्यानंतर बिनती सुनिये, माँ हमारी वंदना स्वीकार करो, शेवटी आखो मे बसी हो माँ मेरे दिलमे बसी हे भजन सादर केले. त्यानंतर डॉ रमेश तागडे प्रसिद्ध रबोलीन वादक (व्हायलिन सारखे वाद्य) स्टेजवर वाजविण्यास बसले. त्यांना पखवाज वादक पं.लक्ष्मीनारायण पवार व तबला वादक श्री विलास खरगोड यांनी साथ दिली. त्यांनी सुरवातीला राग बागेश्री व नंतर राग हंसध्वनी सादर केला. त्यानंतर त्यांनी सर्व चक्रांचे असलेल्या रागांची रागमाला रबोलीनवर सादर करीत शेवटी बिनती सुनिये हे प्रसिद्ध भजन सादर केले. कार्यक्रमाची सांगता वैष्णव जन या भजनाने केली. सदर कार्यक्रमाच्या वेळी सर्वत्र प्रचंड चैतन्य जाणवत होते. शेवटी दीपक वर्मा यांनी, श्री माँ है रंग रेज चुनरी मोरी रंग डाली हे भजन म्हणून सर्वांना नाचवले. कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचे सुमारे १२.०० वाजले होते.

२० मार्च २००६

आजच्या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ठरवून दिलेल्या ६.०० ते ६.३० या वेळातील ध्यानाने झाली. जमलेल्या सर्व सहजयोग्यांना या वेळात ते असतील त्याठिकाणी जागेवर बसून ध्यान करण्यास सांगितले होते. सकाळच्या न्याहरी नंतर १०.३० च्या सुमारास चर्चा सत्र आयोजित केले होते. त्यामध्ये श्री योगेश लोढा यांनी सहजयोग प्रचार प्रसार, आत्मसाक्षात्कार म्हणजे काय, निगेटिव्हीटी म्हणजे काय, इत्यादी विषयांवर जमलेल्या सहजयोग्यांचे विचार सादर करण्यास संधी दिली.

त्यानंतर नगरचे श्री महेंद्र चव्हाण यांना स्टेजवर आमंत्रित केले. त्यांनी चैतन्यशक्ती बाबत, तसेच निर्विचारता, निर्गुण- निराकार-स्वस्वरूपी, आपल्या शरीरातील चैतन्य शक्तीचे अस्तित्व, इत्यादी अत्यंत गहन विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी सर्वांचे सामूहिक ध्यान घेत सर्वांना निर्विचार स्थितीचा आनंद दिला. त्यावेळी दुपारचे २.३० वाजले होते. जेवणानंतरच्या



वक्त्यांमध्ये प्रामुख्याने चंद्रपूर जिल्ह्याचे लीडर श्री पाटील यांनी सर्वांना चांगले मार्गदर्शन केले.

संध्याकाळी ६.०० च्या सुमारास राजीवकुमार यांनी श्री पापाजींचा छिंदवाडा सेमिनारसाठी आलेला संदेश सर्वांना वाचून दाखविला. त्यामध्ये श्री पापाजींनी सांगितले आहे की आज हा आपल्या सर्वांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ऐतिहासिक दिवस आहे. छिंदवाडा जन्म स्थानी येणाऱ्या नवीन पिढीने श्रीमाताजींचे कार्य दुनियाभर सांगण्याचे काम करावयाचे आहे. श्रीमाताजींनी आपल्या सर्वांना प्रेमाचे आशीर्वाद दिले आहेत. तसेच श्रीमाताजीना लवकरात लवकर छिंदवाडा येथे येण्याची इच्छा आहे. त्यावेळी श्री राजीवकुमार यांनी सांगितले की , श्रीमाताजी सध्या सिडनी येथे अत्यंत आनंदी आहेत. अजून काही दिवस त्या सिडनी येथे रहाणार आहेत. तसेच सहजयोग्यांसाठी छिंदवाड्यात बांधावयाच्या आश्रमाच्या मोठ्या इमारतीचा कोनशिला समारंभ श्रीमाताजीच्या हस्ते व्हावा. त्यानुसार ऐच्छिक देणगी घेण्याचे काम सुरू झाले असून लवकरच सहजयोग्यांना राहण्यासाठीच्या आश्रमाची जागा खरेदी केली जाईल. त्यानंतर सेमिनार निमित्त प्रकाशित केलेल्या ''मोक्ष.'' मासिकाचे उद्घाटन झाले.

रात्री ८.०० च्या सुमारास वैतरणा ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी कुचीपुडी नृत्याचे प्रकार सादर केले त्यात त्यांनी, नारायणीयम, लॉड शंकरा नृत्य, शिव अष्टकम, पूर्वगण व शेवटी दशावतार हे प्रकार सादर केले. ८.३० च्या सुमारास दीपक वर्मा गायला बसले त्यांना तबल्याला

साथ संदेश पोपटकर यांनी दिली. त्यांनी तुम बसी हो कन कन मे माँ, गुंजे सदा जयकार श्रीमाजी के भवनमें, जय भोला भंडारी ही भजने सादर केली. त्यानंतर निर्मल संगीत सरिताच्या कलाकारांचे स्टेजवर आगमन झाले. त्यावेळी श्रीमती छायाने, रंग दे श्रीहरी श्री माँ के रंगमे काया,तेरे चरण कमलमे रहनेवाले लिखले मेरा नाम, श्री शाम जैन यांनी, माँ निर्मला माँ हे भजन सादर केले. त्यांना पेटीला साथ श्री गुरुजींनी व तबल्याला साथ श्री संदेश पोपटकर यांनी दिली.

त्यानंतर उपस्थित सर्व सहजयोग्यांनी ''होळी'' साजरी केली. त्यावेळी युवाशक्तीच्या मुलांनी लहान लहान प्लॅस्टिकच्या कपामध्ये रंग सर्वांना वाटले. ते रंग सर्वांनी एकमेकांना अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने एकमेकांना लावून होळीची मजा घेतली. त्यावेळी ढोली-बाजाच्या तालावर सर्वांनी नृत्य केले. सगळीकडे फुले उधळण्यात येत होती. साधारण एक तास हा आनंदाचा कार्यक्रम सुरू होता. त्यानंतर विदेशी सहजयोग्यांनी स्टेजवर गाणी सादर केली. त्यात साऊथ आफ्रिकेच्या सहजयोग्यांनी, महामाया महाकाली, युक्रेनच्या सहजयोग्यांनी लोकल सॉग, सादर केले.

शेवटी नागपूर युवाशक्तीने ''समर्पण'' नाटिका सादर केली. त्यामध्ये श्रीमाताजींच्या जन्मापासून आजपर्यंतच्या घटना सादर करताना त्याला अनुसरून प्रसिध्द गाण्याच्या कडव्याचा मध्ये मध्ये वापर करुन सदर नाटिका अत्यंत हृदयस्पर्शी केली.

त्यानंतर जमलेल्या सर्व सहजयोग्यांना संयोजकांतर्फे गिफ्ट डिस्ट्रिब्युशनचा कार्यक्रम झाला. कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचा १२.०० चा सुमार झाला होता.

२१ मार्च २००६

आजचा श्रीमाताजींचा जन्म दिवस व पूजेचा दिवस. सकाळी १०.०० पासूनच पेंडॉलमध्ये सर्वजण पूजेसाठी जमू लागले. पूजेच्या तयारीच्या वेळी गुरुजींनी व्हायलिनवर, तुझ्या पूजनी अर्चनी, जनम दिन आयो, ही भजने वाजवून सर्वत्र पूजेचे वातावरण निर्माण केले. प्रत्यक्ष पूजेला १२.३० च्या सुमारास सुरुवात झाली. त्यावेळी



सुरुवातीला तीन महामंत्र, गणेश मंत्र, बिनती सुनिये आदिशक्ती मेरी, आवाहन- गणेशमंत्र, अथर्वशीर्ष, हेमजा सुतम, जय गणपती वंदन गणनायका,निर्मला किती वर्णावी तुझी ग स्तुती, हे आदि माँ हे अंती माँ, निर्मल माँ तोरे दर्शन पाने आया हू, श्री जगदंबे आई रे, हासत आली निर्मल आई, छिंदवाडा मे जनम हुवा, ही भजने झाली.पूजेच्या शेवटी श्रीमाताजींची १०८ नावे सर्वांनी घेतली. त्यानंतर स्टेजवर लहान मुलाच्या हस्ते केक कापला. शेवटी आरती झाली.

शेवटी श्री राजेश शहा यांनी कमी वेळेत केलेल्या आयोजना बद्दल सर्व युवाशक्तीचे व लिडरांचे कौतुक केले. कार्यक्रमाची जबाबदारी प्रामुख्याने एम.पी चे लिडर श्री योगेश लोढा, भोपाळचे लिडर श्री हरिष निगम, प्रचार क श्री एस.के. कुलकर्णी तसेच नागपूरचे लिडर श्री सिद्धार्थ गुप्ता, चंद्रपूरचे लिडर श्री पाटील व तसेच त्यांचे सहकारी यांनी पार पाडली. संपूर्ण सेमिनारमधील जेवणाची व्यवस्था इंदूरच्या सहजयोग्यांनी फार सुंदर केली होती. श्रीमाताजींचे जन्मस्थान सजविण्याची जबाबदारी तसेच पुजेची तयारी ही नागपूर सहजयोग्यांनी पार पाडली. तसेच सर्वत्र पडेल ते काम करण्याची जबाबदारी चंद्रपूरच्या सहजयोग्यांनी पार पाडली. तसेच संपूर्ण सेमिनार व रॅली पार पाडण्याची जबाबदारी भोपाळ व मध्य प्रदेशच्या सहजयोग्यांनी पार पाडली. संपूर्ण सेमिनारला शोभा आणली ती परदेशातून आलेल्या १३३ सहजयोग्यांमुळे तर भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या २५०० सहजयोग्यांमुळे.

– जय श्रीमाताजी



# श्री पापाजी यांचे भाषण

(सिडनी- टाऊन हॉल)

दिनांक ६ फेब्रुवारी, २००६

सन्माननीय आणि सुविख्यात पाहुणे, स्त्री-पुरुष सदस्य, ऑस्ट्रेलियातील सहजयोग संघटनेचे राष्ट्रीय समन्वयक Mr. Chris Kyriacou, सहजयोगाच्या प्रगतीसाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय मंडळाचे सर्व सदस्य.

सभ्य स्त्री पुरुषहो,


आपल्या आयुष्यात, आपले मनोगत अचूकपणे व्यक्त करणे अतिशय अवघड जावे, असे काही क्षण येतात. आत्ताचा क्षण हा त्याच प्रकारचा आहे. जे सदस्य आज प्रत्यक्ष उपस्थित आहेत, त्यांचा मी ऋणी आहे हे सांगणे हे माझे सर्व प्रथम कर्तव्य राहील. आपण आधीच ठरलेल्या कार्यात किती व्यग्र आहात हे मला पुरेपूर ज्ञात आहे. ''ऑस्ट्रेलियात सहजयोगाची २५ वर्षे'' हा कार्यक्रम आमच्यासमवेत साजरा करण्यासाठी आपण वेळात वेळ काढलात ही गोष्टच अध्यात्म, नीती आणि चांगले सार्थ जीवन यांप्रती असणारी आपली अभिरुची उत्तम रीतीने व्यक्त करते. म्हणून मी पुन्हा एकदा अभिवादन करतो आणि आपण माझा जो बहुमान केला आहे त्याबद्दल मी परत परत आभार मानतो.

श्रीमाताजी आणि माझ्या उपस्थितीत माझ्या संबंधी फार-फार चांगल्या गोष्टी सांगितल्या गेल्या. माझ्याबद्दल जे जे काही सांगितले गेले, ते सर्वच सत्य असे समजू नका. तथापि माझ्या पत्नीच्या संदर्भात जे म्हटले गेले ते मात्र शंभर टक्के सत्य आहे. तिकडेच मी थोड्या वेळात वळणार आहे.

सर्व प्रथम , ऑस्ट्रेलियातील सहजयोगी किती अद्‌भुत आहेत हे तुम्हास सांगणे मला आवडेल. केवळ काही आठवड्यांपूर्वीच त्यांनी आम्हास आमंत्रण दिले. ते श्रीमाताजींनी स्वीकारले हे तर तुम्ही जाणताच, आणि अवघ्या सहा आठवड्यांच्या अवधीत त्यांनी एकत्र येऊन, एका निवासस्थानाचे आश्रमात रूपांतर केले. हे रूपांतर इतके देखणे झाले आहे की त्यावर विश्वास हा ते प्रत्यक्ष पाहूनच बसतो. त्यांची आई म्हणजेच त्यांच्या आवडत्या श्रीमाताजी यांच्यासाठी या पृथ्वीवरील जणू काही छोटासा स्वर्गच आहे असे हे अद्‌भुत रूपांतर झाले आहे. ते इतके निष्ठावंत आहेत, इतके सरळ आहेत, इतके पवित्र आहेत की त्या सर्वांना आणि व्यक्तिश: प्रत्येकास मी वंदन करतो आणि हे जे अद्‌भुत कार्य त्यांनी केले आहे त्यासंबंधी शाश्वत कृतज्ञता व्यक्त करतो. त्यांच्या ममताळूपणासंबंधी, त्यांच्या पराकोटीच्या स्नेहासंबंधीही मी चिरकृतज्ञता प्रकट करतो. ते माझे आवडते लोक असून मी त्यांना देवदूतच म्हणतो. खरोखरच ते तसे आहेतही.


सभ्य स्त्री पुरुषहो, ऑस्ट्रेलियाचे भूतपूर्व पंतप्रधान माननीय Mr. Gough Whitlam यांचा मी अमाप ऋणी आहे हे मी आवर्जून व्यक्त करतो. त्यांच्याकडून माझे स्वागत होण्याचा सन्मान मला मिळाला. आजच्या जगास ज्याची नितांत गरज आहे अशा द्रष्ट्या नेत्यांपैकी आजचे ते एक नेते आहेत. आमच्या या भेटीबद्दल त्यांनी प्रोत्साहक शब्दात वर्णन केल्याने मी कृतज्ञ आहे. ऑस्ट्रेलियाचे विरोधी पक्षनेते माननीय Kim Beazley

एनएसडब्लूचे सर्वश्रेष्ठ माननीय Mr. Morris Lemma, पश्चिम ऑस्ट्रेलियाचे सर्वश्रेष्ठ माननीय Alan Carpenter, दक्षिण ऑस्ट्रेलियातील ॲडलेड सदस्य माननीय Kate Ellis, आदान प्रदान शिष्टाचार मंडळाचे संचालक Mr Jule du Varrens, एनएसडब्लू मधील विरोधी पक्षनेते Mr. Peter Debnam आणि सिडनीचे महापौर Clover Moore या सर्वांविषयी तितकीच कृतज्ञता मी व्यक्त करतो. ज्या प्रेमळ शब्दात आमचे स्वागत झाले तत्संबंधी आमची कृतज्ञता आम्ही व्यक्तवितो.




सभ्य स्त्री पुरुष हो, मला तुम्हास जे सांगावे असे फार फार वाटत होते तिकडे मी येतो.आजचा हा मेळावा ही एक न चुकविण्याजोगी संधी आहे. आणि ती साधून मी माझे मनोगत सांगणार आहे. पण पहिल्याप्रथम मला तुम्हाला सांगावेसे वाटते की येथे बसलेल्या श्रीमाताजी या माझ्या पत्नी आहेत आणि त्या गेली पस्तीस वर्षे प्रेम व एकता यांचा जगभर प्रसार करीत आहेत. विश्वास ठेवा की त्यांनी विमान, हेलिकॉप्टर, बस, बैलगाडी, प्रसंगी पायीही- म्हणजेच चालत इ. विविध मार्गांनी अखंड परिश्रम केले आहेत. खेडी, शहरे, पाचही खंडातील अनेक ठिकाणी- या जगास नव्या संदेशाची गरज आहे यावर दृढ विश्वास ठेवून कार्य अखंड चालू आहे. यावर श्रद्धा ठेवली पाहिजे. तरच जग तरू शकेल.

मानवजातीस काहीतरी अभिनव दिले पाहिजे. या विश्वासावर त्यांनी एकटीनेच कित्येक वर्षे कार्य चालू ठेवले आणि आज ८० ते ९० देशांत त्यांचे अनुयायी आहेत. मी कोठेही गेलो तरी तेथे सहजयोगी आणि सहजयोगिनी यांच्या रूपाने मला त्यांच्या आवडत्या मुलांचे दर्शन होतेच. केवढे आश्चर्यजनक कार्य त्यांनी केले आहे! ते काय आहे? एक पती म्हणून मला ते कार्य कसे दिसते? हे सर्व करावयाचे म्हणजे आमच्यापासून दूर राहणे आणि तेही दीर्घ काळ, हे आलेच! पण काहीतरी विश्वकल्याणाचे कार्य त्या करीत आहेत हा विश्वास वाटे. माझ्या दृष्टीने त्यांचा संदेश अगदी सोपा व सरळ आहे. त्या म्हणतात- या पृथ्वीतलावरील सर्व स्त्रिया, पुरुष, मुलं ही एकाच परमेश्वराची निर्मिती आहे. कुणी म्हणतं हा माझा परमेश्वर आहे, कुणी म्हणतं तो माझा परमेश्वर आहे, परंतु परमेश्वर हा एकच असू शकतो. एकापेक्षा जास्त म्हणजे अनेक परमेश्वर असूच शकत नाही. एकच परमेश्वर! म्हणजेच सर्वव्यापी परमेश्वराची प्रेम शक्ती होय. त्या पुढे म्हणतात की, या पृथ्वीतलावरील सर्व मानवजातीची निर्मिती ही त्या परमेश्वरानेच केलेली आहे. मग ते कुणीही असोत. काळे असोत अथवा गोरे असोत. ऑस्ट्रेलियातील असोत नाहीतर आफ्रिकेतील असोत. भारतातील असोत अथवा अन्य कुठलेही असोत. ती सगळी श्रीमाताजींचीच मुले आहेत. त्या परमेश्वराचीच मुले आहेत. मग जर असं असेल, तर सर्वांनी बरोबरच, सलोख्याने, आनंदाने का राहू नये? आपण विभक्त असल्याची, एकमेकांच्यात विरोधीपणाची भावना कां असावी? यावर विश्वास असला पाहिजे. हा संदेश श्रीमाताजींनी सर्वांसाठी म्हणून आणला आहे आणि कित्येक श्रोतृवृंदास दिलाही आहे. त्यावेळी त्यांचे प्रतिपादन असे- तुम्ही त्या सर्वश्रेष्ठ शक्तीची निर्मिती आहात, तुम्ही त्या शक्तीचे प्रतिबिंब आहात. तुमच्यात एक दृढ शक्ती आहे आणि त्या शक्तीस मी जागृत करेन. त्या शक्तीचे नांव कुंडलिनी. ती जागृत झाल्यावर तुम्ही त्या ईश्वरी शक्तीशी जोडले जाल. त्यानंतर नीतिशास्त्र, सन्नीतीची नियमप्रणाली आणि जे जे म्हणून चांगले आहे, त्या त्या सर्व गोष्टींनी समृद्ध असे



तुमचे जीवन होईल. तेंच तुमचे ध्येय असेल.

सभ्य स्त्री पुरुष हो, मला माझ्याच संदर्भातील एक कूट तुमच्यापुढे विचारार्थ ठेवायचे आहे. मी शासकीय नागरी सेवक म्हणून हिंदुस्थानची सेवा केली आहे. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय सागरी संस्थेचा प्रमुख सचिव म्हणून कार्य करण्याचे सौभाग्यही मला प्राप्त झाले होते. हे कार्य संयुक्त राष्ट्रसंघाचे होते. सभ्य स्त्री पुरुषहो, शक्य झाले तर माझ्यावर विश्वास ठेवा की, राष्ट्रसंघ पातळीवर कार्य करतांना मी त्यांच्या (श्रीमाताजींच्या )कल्पनांचीच कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला. संयुक्त राष्ट्रसंघात पुष्कळ राष्ट्रे आहेत. भिन्नभिन्न आर्थिक पातळ्यांवर प्रगती झालेली राष्ट्रे, भिन्न भिन्न क्षमता असणारी राष्ट्रे एकत्र येतात आणि एकत्र कार्य करतात. हे काम सोपे नाही. मी सागरी जगात होतो आणि जेव्हा मी प्रधान सचिव म्हणून निवडला गेलो, तो विकसनशील देशांतून निवडून आलेला पहिला सदस्य ठरलो. हे पद मिळवणारे आधीचे सर्व सदस्य युरोपीय होते आणि विकसनशील देशातील व्यक्ती या पदावर निवडून यावी याचेच लोकांना आश्चर्य वाटत होते. तो सागरी वातावरणाचा काळ पाश्चिमात्य संकेतांनी भारावलेला होता. किती कठीण काम होते!

मी म्हटलं, मी निवडला गेलो आहे, म्हणून मी सेवा केली पाहिजे. श्रीमाताजींचा जो संदेश आहे- प्रत्येकजण सारखा आहे. प्रत्येकजण समान आहे. या संदेशाचे मी उपयोजन केले पाहिजे. पूर्वीच्या काळी काही असे नव्हते. नौकानयनाची सोय असलेल्या श्रीमंत राष्ट्रांचे वर्चस्व असे. कारण त्यांच्याकडे सागरी कौशल्य होते. पुष्कळ विकसनशील राष्ट्रे यापासून दूर राहिली होती. ही संघटना योग्य प्रकारची जागतिक संघटना कशी करावी हा प्रश्न होता. विकसनशील राष्ट्रांचा यामध्ये समावेश करणं हे विकसित राष्ट्रांच्याही हिताचे होते. हे जाणून मी या कार्यास प्रवृत्त झालो.

विकसित राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांना याबाबत साह्य करणं आणि त्यांना या संघटनेचे सदस्य करून घेणं ही गोष्ट भूषणास्पद होती आणि लवकरच सर्व एकत्र आले. आज ही संघटना ही जगातील उत्कृष्ट संघटनांपैकी एक आहे. कारण आज या संघटनेला जगातील प्रत्येक राष्ट्राचा पाठिंबा आहे. याच भूमिकेवर आधारित असा, मला तुमच्यापुढे एक प्रस्ताव ठेवायचा आहे. हा प्रस्ताव पुढीलप्रमाणे आहे.-

आज तुम्हीं जर वर्तमानपत्रं वाचलीत, बातम्या ऐकल्यात, तर तुम्हाला असं दिसून येईल की सारं जग हे अस्वस्थ, चिंतातुर आहे. लोकांमध्ये द्वेषाची किंवा असूयेची भावना वाढीस लागली आहे. जगात हिंसाचार माजला. कां? कशासाठी? यातून कोणाचं भलं होणार आहे? जर आपण एकाच परमेश्वरी शक्तीची लेकरे आहोत, तर हे सर्व कशासाठी? आपण सर्वजण गोडी-गुलाबीने एकत्र राहू शकत नाही कां? मतभिन्नतेवरच आपण इतका भर कां द्यावा? श्रीमाताजींप्रमाणे आपण आपल्या एकीविषयी कां बोलू शकत नाही? आणि यात अशक्य असं काहीच नाही. याउलट ही गोष्ट प्राप्त करण्याजोगी आहे आणि आज जगास त्यांच्या या प्रेमाच्या संदेशाची आवश्यकता आहे. हा संदेश तुम्हांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी इतका रस घेण्याचे कारण हे आहे की, ऑस्ट्रेलियामध्ये काही चांगले आहे असे मनापासून वाटते. तुमची खोटी स्तुती मला करावयाची नाही. माझा या गोष्टीवर विश्वास नसता तर मी हे विधान केले नसते. पण माझा विश्वास आहे कारण मला ऑस्ट्रेलियात पाश्चिमात्य निष्ठांतील सर्वश्रेष्ठ जीवनमूल्ये आढळली. त्यांचा मी आदर करतो. मी एक स्वाभिमानी हिंदुस्थानी आहे. मला माझ्या परंपरेचा अभिमान आहे. परंतु त्याचबरोबर मला इंग्रजांचाही आदर वाटतो. त्यांनी हिंदुस्थानास परतंत्र केले होते हे दुर्लक्षिले

तर, जर तुम्ही इंग्लंडमध्ये रहिवासी म्हणून गेलात तर ते लोक जीवननिष्ठांनी ओतप्रोत भरलेले आहेत. नीति-नियमांनी समृद्ध आहेत, नियमांचे पालन करणारे आहेत. व्यवस्थितपणाचे पाठीराखे आहेत असे आढळेल. या सर्व गोष्टींचा ऑस्ट्रेलीय नागरिकांत समावेश झालेला आढळतो. पण इतकेच नव्हे तर याहूनही आणखी काहीतरी, कदाचित काहीसे अज्ञात, पण एक निरीक्षक म्हणून मला मात्र दिसलेले असे काही तरी आढळून येईल.ते म्हणजे श्रेष्ठत्व, शालीनता, विनय, प्रेमळपणा, कृपाळुपणा. या गुणांच्या संयोगाने एक अद्‌भुत राष्ट्र निर्माण होते. येथे (ऑस्ट्रेलियात)भिन्न भिन्न राष्ट्रांतून आलेले, भिन्न भिन्न वंशातील असणारे असे लोक ऑस्ट्रेलीयन म्हणून सुखासमाधानाने नांदताना आढळून येतील. हे जे आदर्श आहेत, जे श्रीमाताजींचे स्वप्न आहे, ते मी ऑस्ट्रेलीय राजकारणात पाहत आहे. म्हणून मी म्हटले; की श्रीमाताजींच्या संदेशावर बोलण्याची संधी मला मिळाली तर येथे त्याचा आरंभ का करू नये?

म्हणून माझी आपणाकडे अशी विनंती आहे की, श्रीमाताजींनी त्यांचे काम केले आहे. त्यांनी गेली ३५ वर्षे अखंड भ्रमंती केली. त्यांनी त्यांचे कर्तव्य केले. ८० ते ९० देशांत सहजयोग पोहोचवला. खरोखर ही किती चांगली निर्मिती आहे !

आपणास एक प्रसंग सांगतो.

पूर्वी जेव्हा आम्ही लंडनमध्ये होतो, तेव्हा एका सायंकाळी सुमारे २५ सहजयोगी तिच्या भोवताली होते. त्यांचे संभाषण चालले होते मीही ते सर्व पहात तेथे बसलो होतो. मला हळू हळू आश्चर्य वाटू लागले की त्या समूहामध्ये भिन्न भिन्न देशांतील भिन्न भिन्न वेशातले, भिन्न भिन्न वर्णातले, भिन्न भिन्न धर्मातले लोक होते. एक होता कॅथॉलिक, एक प्रॉटेस्टंट, एक यहुदी, कुणी मुसलमान, कुणी शीख, कित्येक हिंदु होते. परंतु सहजयोगात येण्यापूर्वी ते कोण होते, याची त्यांना निव्वळ आठवण तरी होती का? नव्हती! ते तेथे बसले होते ते सहजयोगी म्हणून. जगाचे नागरिक म्हणून. श्रीमाताजींची लाडकी मुले म्हणून. श्रीमाताजी तर हे सर्व केव्हांच विसरून गेल्या होत्या. कसलीच भिन्नता उरली नव्हती. संपूर्ण एकता भरून राहिली होती.



आता मी आपणास एक आवाहन करतो एक मागणी करतो की, या जगतास साह्य करावे. सध्याचे जग हे निश्चितपणे संकटग्रस्त आहे. हे मी खात्रीपूर्वक सांगू शकतो. म्हणून मला आपल्याकडे एक मागणी करायची आहे की, या जगाला त्यातून बाहेर काढा. प्रत्येक दिवशी घडणाऱ्या वाईट घटनांची आपणास माहिती नाही का? लोकांना दुष्कृत्ये करावीशी वाटतात.

यावर मात करता आली पाहिजे. पण यासाठी जबरदस्ती नको. त्याचा उपयोग नाही. त्याचा उपयोग कधीच होणार नाही असं नाही. कधी तरी जबरदस्ती करावी लागते. पण जर जगातील सर्व लोकांना आज एकत्र आणायचं असेल तर सहजयोगाच्या तत्त्वज्ञानाच्या (जे भारतीय तत्त्वज्ञानावर आधारित आहे)आधारावरच यश मिळू शकेल. काय आहे हे तत्त्वज्ञान? साऱ्या जगामध्ये एकच ईश्वरी शक्ती कार्य करीत आहे. हे जग म्हणजे एक विशाल कुटुंबच आहे. यामध्ये सर्व धर्मांचे लोक, सर्व वर्णांचे लोक, विविध भाषा बोलणारे लोक एकत्र येतात. जर हा संदेश किंवा हे विचार जर तुम्हाला मान्य असतील तर त्याचा प्रसार केला पाहिजे.

पण जर हा संदेश दिला गेला नाही, जर लोक त्या निष्कर्षाप्रत येत नसतील, तर सर्व प्रकारचे भेद हे असेच राहतील. जर A विरुध्द B विरुद्ध C ------ हे अशाच प्रकारे चालू राहिले तर जगातील समस्या केव्हांच

सुटणार नाहीत. हे धोक्याचे परिणाम दुर्लक्षून चालणार नाही. तेव्हा याचा विचार पुरेशा गांभीर्याने व्हायला हवा.

मी जे काही प्रतिपादन करीत आहे, ते जर तुम्ही मन:पूर्वक जाणून घेतलेत आणि त्या दिशेने पावले टाकलीत, तरच आम्ही ऑस्ट्रेलियाला आल्याचे सार्थक होईल.

मला हेच सगळं आपल्याला सांगायचं होतं. माझ्याबद्दल जे गौरवोद्‌गार तुम्ही काढले, त्याबद्दल मी आभारी आहे. परंतु हे सर्व, श्रीमाताजींनी मला जे काही दिले आहे त्याचेच प्रतिबिंब आहे. माझं हृदय परिवर्तन त्यांच्यामुळेच झालेले आहे. माझे हे निवेदन संपवण्यापूर्वी मी तुम्हास माझ्यातील परिवर्तन कसे झाले हे सांगतो. मी एक शासकीय नागरिक आहे. माझ्या मनाची पूर्ण खात्री झाल्याशिवाय मी कोणतीच गोष्ट स्वीकारत नाही. म्हणून ३५ वर्षापूर्वी जेव्हां त्यांनी मला सांगितले की मी असा एका उपक्रम धडाक्याने चालू करणार आहे की त्याद्वारे सर्व लोकांमध्ये परिवर्तन होईल. तेव्हां मला या वाक्याचे हसू आले. मी साशंक होऊन विचारले, तुम्ही सर्व लोकांना बदलणार? असा तुम्हाला विश्वास आहे? पण असं काहीतरी घडलं, की त्यामुळे मी बदललो आणि ही घटना फार चांगली झाली.

जेव्हा लंडन येथे प्रमुख सचिव पदासाठी मी निवडला गेलो, तेव्हा आम्हीं एका निवासस्थानाची निवड केली. ते निवासस्थान लंडन येथे थोडे बाहेरील बाजूस होते. एका संध्याकाळी मी ऑफिसमधून घरी आल्यावर बघतोय, तर आमच्या दिवाणखान्यात एक अनोळखी इसम पेपर वाचत बसला होता. त्याने माझे कपडे घातले होते. मी घरात प्रवेश केल्यावर तो माझ्याकडे अशा तऱ्हेने पाहू लागला की जणू काही मीच एक घुसखोर आहे. मी माझ्या पत्नीला विचारले हे काय? हा माणूस कोण आला आहे? तेव्हां त्यांनी मला सांगितले की रस्त्यावरून जात असताना त्यांना एक आजारी इसम रस्त्यात पडलेला दिसला. त्याचे कपडे खराब झालेले होते. त्यांनी गाडीतून उतरून त्याची विचारपूस केली. त्याची काळजी घेणारे कुणीही नव्हते. तेव्हा त्यांनी त्या इसमास गाडीतून घरी आणले. त्याची स्वच्छता करून त्याला माझे कपडे घालायला दिले. त्या मला म्हणाल्या, त्याची काळजी घेणारे कुणी नाही म्हणून मी त्याला आपल्या घरी आणले.

हे सर्व कळल्यावर तो माणूस माझ्या कपड्यात कसा/ याचा मला उलगडा झाला. त्यांनी त्या माणसाला केलेली मदत पाहून मलाही त्यांच्याबद्दल कौतुक वाटले आणि मी त्यांना म्हणालो की खरंच तुम्ही फार चांगले केलेत.

दुसऱ्या दिवशीपासून त्यांनी त्या इसमाला सहज ट्रिटमेंटस चालू केल्या. प्रत्येक आठवड्यानंतर म्हणजे दर आठवड्याला त्याच्यामध्ये फारच सुंदर बदल आम्हाला जाणवू लागले. त्याची सर्व व्यसने सुटून गेली होती आणि आता आम्हाला त्याचे व्यक्तिमत्त्व एका फुलाप्रमाणे वाटू लागले होते. तेव्हां मात्र मला आश्चर्य वाटले व अशी खात्री वाटली की ही व्यक्ती जर इतकी बदलू शकते, तर अशाच पद्धतीने जगातील सर्व लोक बदलू शकतील असा दृढ विश्वास वाटला आणि मी ही बदललो- आणि तेव्हां मी सहजयोगी झालो.

स्त्री पुरुष हो, मी आता आपला फार वेळ घेत नाही. आता मी निष्कर्षाप्रत येतो. पुन्हा एकदा तुमचे आभार मानतो.

तुम्ही आपला अमूल्य वेळ खर्च करून येथे आलात, त्याबद्दल मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. आज येथे जे काही मी व्यक्त केले ते सर्व संदेश श्रीमाताजींचे होते. मी केवळ ते आपल्यापर्यंत पोहोचवले. कदाचित जे लोक सहजयोग कार्याचा प्रसार करत आहेत, ते प्रयत्न आणखी वाढवता येतील आणि कदाचित सहजयोगाची तत्त्वं सांगणारे संदेश ऑस्ट्रेलियाहून व्यापक प्रमाणावर साऱ्या जगामध्ये पोहोचतील. ते संदेश म्हणजे-

आपण, सर्व जगातील लोक हे एकाच परमेश्वरी शक्तीची मुलं आहोत. आपण सर्व गोडी- गुलाबीने, बंधुत्वाच्या नात्याने राहूया. कशाला भांडणं? कशाला तंटे? सर्वांनी एक होऊ या. सर्व जगाला वाचवायचं असेल,एकत्र आणायचं असेल आणि सुखी, आनंदी व्हायचं असेल तर हा एकच मार्ग आहे.

सर्वांचे मन:पूर्वक आभार.

●●●

# शिव पूजा, ऑस्ट्रेलिया, २००६











# होळी समारंभ ऑस्ट्रेलिया, बर्वुड, २००६











# होळी समारंभ ऑस्ट्रेलिया, बर्वुड, २००६













# साधना दीदींचा वाढदिवस समारंभ - ४ फेब्रुवारी, २००६











भारतीय प्रजासत्ताक दिन व
ऑस्ट्रेलिया दिन , बर्वुड

ऑस्ट्रेलियातील भारतीय दूतावासात
साजरा झालेला भारतांचा प्रजासत्ताकदिन

# पूजाविधीचे महत्त्व

प.पू. श्रीमाताजींच्या साक्षात् चरणकमलांची वा प्रतिमाचरणांची पूजा करण्यासाठी उपस्थिती लाभणे हे सहजयोग्यांचे भाग्य आहे.या पूजाविधीमध्ये श्रीमाताजींचे साक्षात् अस्तित्व असल्यामुळे पूजेसाठीं उपस्थित राहणें ही सहजयोग्यांवर खास जबाबदारी आहे हे ओळखून योग्यांनी पूर्ण समर्पित भावना बाळगून श्रीमाताजींच्या चरणावरच पूर्ण वेळ चित्त ठेवल्यावर पूजेचा प्रसाद मिळत असतो.पूजा संपूर्णपणे हृदयातून झाली पाहिजे; त्यामुळें हृदयस्थ आत्मा श्रीमाताजींची पूजा केल्यानें प्रसन्न होतो आणि आपण चैतन्य-प्रसादामधें चिंब होऊन जातो. पूजा हा साधकांना परमानंद देणारा विधी असतो आणि त्यांतून योगी आध्यात्मिक प्रगतिपथावर राहतात.

''पूजा हृदयांतून झाली पाहिजे तरच त्या पूजेचा आनंद शाश्वत व चिरंतन होतो.''(श्रीमाताजी)

''पूजेमध्ये निर्विचारता साधली की हृदयातून पूजा केली जात आहे हे लक्षात घ्या.''(श्रीमाताजी)

''पूजेमधें तुम्ही उन्नत होत असता. कांही जणांना ही स्थिती टिकवता येते तर कांहींजण यो-योसारखे आत-बाहेर होत असतात. म्हणून निर्विचार स्थितीत ध्यानात राहणे आवश्यक असते''(श्रीमाताजी)

: पूजा तुम्ही स्वत:साठी करत नसून मला जाणणाऱ्या समस्त सहजयोग्यांसाठी करता. म्हणून पूजेचा तीर्थ -प्रसाद सर्वांसाठी असतो. म्हणून अजून अर्धवट असलेल्या सहजयोग्यांना दूर ठेवणे चांगले.''(श्रीमाताजी)

उपकरणे व सामग्री : पूजेची सर्व उपकरणें - समई, निरांजन, कलश, तबक, तांब्याची भांडी, अभिषेकाची थाळी इ.- घासून चकचकीत असावी आणि कुंकुमतिलक लावून सुशोभित करावी. पूजासाहित्याला तत्त्वार्थ असतो. कलशकुंभ श्रीगणेश व कुण्डलिनीचे, नारळातील पाणी सागराचे, कलशातील पाणी पवित्र तीर्थाचे व पाने-फुले पृथ्वीतत्त्वाचे द्योतक असतात. कुंकुममिश्रित अक्षता स्वागतार्थ दर्शवतात. सुपारीरूपात श्रीगणेश पूजेमधील विघ्न दूर करण्यासाठीं, पंचामृत अभिषेकासाठीं असते. दिवा(ज्योत) ज्ञानदर्शक, हळकुण्ड कल्याणदायक, कुंकू मांगल्यदायक व सिंदूर उन्नतिदायक अशा अर्थानें वापरले जाते.

मंत्र : पूजेच्या वेळेस जे मंत्र म्हणतो त्यांचे उच्चार स्पष्ट व शास्त्रशुद्ध असले पाहिजेत व ते नीट स्वर-लयीत म्हणणे आवश्यक आहे. तसे म्हटल्यावरच मंत्र अर्थपूर्ण व चैतन्यवाहक होतात. श्री गणेश मंत्र व अथर्वशीर्ष श्रीगणेशांना आवाहन करण्यासाठीं व मूलाधार चक्र जागृत करण्यासाठी, श्रीविष्णूंची २४ नावे नाडी शुद्धीसाठीं, प्राणायाम डावी व उजवी बाजू संतुलनांत आणण्यासाठी, गुरु-मंत्र भवसागर जागृत करण्यासाठीं, गायत्री मंत्र पंचमहाभूत देवतांना आणि ज्ञानवृद्धीसाठी सूर्याला आवाहनासाठीं म्हटले जातात.

''पूजेमधें मंत्र पूर्ण श्रद्धेने म्हटले पाहिजेत. श्रद्धेला अन्य पर्याय नाही. श्रद्धाभावनेने मंत्र म्हटल्यानंतरच त्यांतून प्रसादरूपी चैतन्यलहरी प्रवाहीत होतात.''(श्रीमाताजी)

संगीत : पूजेमध्यें भजनें व श्रीमाताजींची स्तुती करणारी पदे म्हणावीत. भारतीय संगीतशास्त्राप्रमाणें भजने,गाणी म्हटल्यास चैतन्य अधिक प्रवाहित होते, कुण्डलिनी प्रसन्न होते व पूजेचा आनंद वृद्धिंगत होतो. संगीतामधून आपली भक्ती व समर्पण व्यक्त व्हावे.

सहजयोग्यांसाठी काही सूचना :: पूजेचा चैतन्यमय प्रसाद मिळण्यासाठीं योगी पूजेला उपस्थित राहतात.: सामूहिक चक्रशुद्धि पूजेमधून होत असते. म्हणून चित्त सहस्रारांत ठेवले की श्रीमाताजींनी प्रवाहित केलेले चैतन्य खेचले जाते व योगी स्वच्छ होतो. हे घडले नाहीं तर श्रीमाताजींना त्रास होतो. पूजेसाठी मिळेल त्या जागेवर स्वस्थ बसावे, त्याबाबतीत चिकित्सा करू नये.: पूजा संपल्यावर पूर्ण शांतपणे थोडा वेळ बसावे व चैतन्याचा आनंद प्रस्थापित करावा. आपले डोळे सतत उघडे ठेवावे कारण आपण श्रीआदिशक्तीच्या समोर असतो.

# ऑस्ट्रेलियाहून वृत्त

## श्रीमाताजींचे ऑस्ट्रेलियात आगमन



दिनांक १४ जानेवारी रोजी रात्री श्रीमाताजी व कुटुंबीयांचे ऑस्ट्रेलियात आगमन झाले. जवळ जवळ ५०० सहजयोग्यांनी श्रीमाताजींचे खूप उत्साहात स्वागत केले. स्वागताच्या वेळी लहान मुले हातात फुले घेऊन हसऱ्या व आनंदी मुद्रेने अवती-भवती उभी होती.

सर्व सहजयोग्यांच्या मनापासूनच्या भावना, संगीत व स्तुतीनी युक्त असे स्वागत खरोखरीच देवदुर्लभ होते. खूप वर्षांनंतर भेटावयास आलेल्या आईचे तिच्या मुलांनी जसे स्वागत करावे याचेच ते प्रत्यक्ष दर्शन होते.

श्रीमाताजी बऱ्याच वर्षांनंतर ऑस्ट्रेलियाला आल्याने, ऑस्ट्रेलियातील सर्व सहजयोग्यांचा आनंद ओसंडून वाहत होता. ते सर्व स्वागत पाहून श्रीमाताजीही खूप खुष झाल्या. सर्व लहान मुलांनी हातातील फुले श्रीमाताजींच्या चरणांवर वाहिली. एकीकडे भजने झाली.

## सहजयोगाचा ऑस्ट्रेलियातील रौप्य महोत्सवी कार्यक्रम
## (दि. ६ फेब्रुवारी २००६) सिडनी टाऊन हॉल



ऑस्ट्रेलियात सहजयोग चालू करून २५ वर्षे झाली. त्याबद्दल रौप्यमहोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी संपूर्ण कार्यक्रमात प्रचंड चैतन्य जाणवत होते. त्यामुळे आपल्या सर्वांच्या पाठीशी साक्षात आदिशक्ती आहे याची अनुभूती सर्वांना येत होती.

उपस्थितांना श्रीमाताजींकडे हात करून बसण्यास सांगण्यात आले. पूर्ण मांगल्यमय वातावरण होते. संपूर्ण शांतता होती. थंड चैतन्यलहरींची जाणीव सर्वांना होत होती. परमेश्वरी शक्तीशी एकरूप झाल्याचा प्रत्यय सर्वांना येत होता. या रौप्यमहोत्सवी कार्यक्रमाच्या वेळी श्रीपापाजींचे भाषण झाले.

श्रीमाताजींचे संदेश श्रीपापाजींनी नेहमीप्रमाणेच आपल्या अप्रतिम भाषाकौशल्याने श्रोतृवृंदाच्या हृदयापर्यंत पोहोचवले. सर्वांच्या डोळ्यात आनंदाश्रू होते (भाषण स्वतंत्र दिले आहे.)

## साधना दीदींचा वाढदिवस समारंभ - ४ फेब्रुवारी, २००६



श्रीमाताजींनी साधनादीदींचा वाढदिवस त्यांच्या घरी येऊन साजरा करण्याची परवानगी आपल्या मुलांना दिल्यामुळे सर्वजण खुष झाले. मुलांच्या दृष्टीने यापेक्षा चांगली घटना आणखी कोणती असणार? सर्व लहान मुले अतिशय आतुरतेने, उत्कंठेने जमली होती. बऱ्याच मुलांनी अतिशय प्रेमाने आणलेले फुलांचे गुच्छ साधना दीदींना भेट दिले. युवाशक्तीने व लहान मुलांनी त्यावेळी श्रीमाताजींची भजने म्हटली. त्यातील बऱ्याच जणांनी श्रीमाताजींच्या चरणकमलांवर फुले अर्पण केली.

त्यावेळी त्यांच्या सभोवताली असणाऱ्या प्रत्येक लहान मुलावर आणि इतरांवर श्रीमाताजींचे बारीक लक्ष होते. श्रीमाताजींनी आशीर्वादित केलेल्या भरपूर भेटवस्तू मुलांना वाटण्यात आल्या. वाढदिवस समारंभातील सर्व रंगीबेरंगी क्षण मुलांच्या चिरकाल स्मरणात राहतील.

## ऑस्ट्रेलियातील भारतीय दूतावासात साजरा झालेला भारताचा प्रजासत्ताकदिन, २६ जानेवारी २००६



उत्तर सिडनीमधील Killara येथिल, भारतीय दूतावास प्रमुख यांच्या घरी आणि त्या भूमीवर हिंदुस्थानी प्रजासत्ताक दिन साजरा करतांना सर सी.पी.श्रीवास्तवसाहेब सन्माननीय प्रमुख अतिथी म्हणून लाभले होते. सध्या ऑस्ट्रेलियात काही निमित्तांनी आलेल्या प्रमुख व्यक्तींनी, हिंदुस्थानचा राष्ट्रध्वज उभारण्याच्या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. हिंदुस्थानी दूतावास प्रमुख Mr Sujana R. Chinoy आणि तेथील काही प्रसिद्ध व्यक्ती यांनी सर सी.पी.श्रीवास्तवसाहेबांचे मनापासून स्वागत केले. राष्ट्रगीत गाऊन झाल्यावर, हिंदुस्थानच्या राष्ट्राध्यक्षांच्या भाषणाचे प्रकट वाचन Mr. Chinoy यांनी केले.

## भारतीय प्रजासत्ताक दिन व ऑस्ट्रेलिया दिन , बर्वुड



श्रीमाताजींच्या सिडनीतील बर्वुड येथील घरी २६जानेवारी,२००६ रोजी सायंकाळी संगीताचा कार्यक्रम करण्याची संधी प्राप्त झाली. त्यावेळी भारताचे राष्ट्रगीत तसेच ऑस्ट्रेलियाचेही राष्ट्रगीत गाऊन ऑस्ट्रेलिया दिन व भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.त्यावेळी श्रीमाताजींनी काही भजने म्हणण्याची परवानगी दिली. त्यानंतरही आणखी काही भजने ऐकण्याची इच्छा त्यांनी दर्शविली.

बर्वुड आश्रमाचे नूतनीकरण आश्चर्यकारकरीत्या झाल्याबद्दल श्रीपापाजी यांनी सर्वांचे आभार मानले. तसेच बिल्डरांचे आभार मानले. तसेच जे डॉक्टर्स सतत श्रीमाताजींची काळजी घेत आहेत, त्यांचेही आभार मानले. त्यांचे बोलून झाल्यावर श्रीमाताजींनी आणखी ऐक भजन एकण्याची इच्छा दर्शविली. सर्वांना अतिशय आनंद झाला.

## परमपूज्य श्रीमाताजींची साकार रूपातील वाढदिवस - पूजा, (वृत्तांत)

### सिडनी, २१ मार्च, २००६



दिनांक २१ मार्च २००६ रोजी सिडनी येथील ग्रँड हॉलमध्ये सुमारे १५००हून अधिक सहजयोगी बंधू-भगिनी जमले होते. परमपूज्य श्रीमाताजींच्या साकार रूपातील उपस्थितीत सर्वजण अतिशय आनंदात व उत्साहवर्धक वातावरणात बसले होते. भरपूर फुले वापरून अतिशय अप्रतिम सजावट करण्यात आली होती. स्टेजच्या मागील बाजूस श्रीमाताजींचे विविध रूपांतील फोटो लावण्यात आले होते. सभागृहात सर्व सहभागी राष्ट्रांचे राष्ट्रध्वज फडफडत होते. ही सर्व राष्ट्रे या पवित्र समारंभास उपस्थित होती.

पूजेच्या सुरवातीस श्रीमाताजींच्या चरणावर लहान मुलांनी प्रत्येकाने ओंजळी भरभरून फुले अर्पण केली. त्यानंतर युवाशक्तीने फुले अर्पण केली व नंतर ऑस्ट्रेलियाच्या प्रतिनिधींनी हार अर्पण केला.

श्रीमाताजींच्या चरणकमलांभोवती रंगीबेरंगी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. पूजेच्या वेळी श्रीमाताजी अत्यंत प्रसन्न दिसत होत्या. पूजेनंतर जगभरातून आलेल्या विविध देशांच्या प्रतिनिधींनी श्रीमाताजींना भेट वस्तू अर्पण केल्या. शेवटी ऑस्ट्रेलिया व युवाशक्तीने भेटवस्तु अर्पण केया. श्रीमाताजी भेटवस्तूकडे अत्यंत आत्मीयतेने व कौतुकाने पहात होत्या. सर सी.पी.साहेबांचा वाढदिवस त्याचदिवशी असल्याने त्यांनाही खास भेटवस्तू देण्यात आली. तसेच त्यांच्या दोन्ही कन्यांचाही सत्कार करण्यात आला.

वाढदिवसासाठी ७ थर असलेला प्रचंड केक आणला होता. सर्वात वरच्या थरावर मेणबत्या होत्या. जणूकाही ते सहस्राराचे दर्शन होत होते. सर्वांच्या उपस्थितीत केक कापण्यात आला.

## ऑस्ट्रेलियाच्या प्रतिनिधींतर्फे वृत्त- २१ मार्च २००६



आम्हा सर्वांना असे वाटले की जगज्जननी श्रीमाताजींना वाढदिवसाची भेट आपण ती काय देणार? तेव्हा आम्हाला असे वाटले की आपण मुले त्यांना तीन गोष्टी देऊ शकतो. त्याम्हणजे आपल्या आईप्रती प्रेम, दृढ श्रद्धा आणि कधीही न फिटणारे ऋण. म्हणून या सर्वांचे प्रतीक म्हणून आपल्या सर्वांच्या हृदयांच्या किल्ल्या श्रीमाताजींना अर्पण करण्यात आल्या. त्यावेळी दोन चांदीची हृदये अर्पण करण्यात आली. त्यात एकामध्ये सिडनीतील श्रीमाताजी व श्री पापाजी यांच्या घराची किल्ली.

दुसऱ्या चांदीच्या हृदयात ठेवली होती आपल्या सर्वांच्या हृदयांची किल्ली. (म्हणजेच प्रेम व दृढ श्रद्धा ) ह्या हृदयाच्या किल्ल्या दर्शवत आहेत- श्रीमाताजी, जगातील सर्व सहजयोग्यांतर्फे आपले सदैव स्वागतच आहे.

जय श्रीमाताजी.

श्री गणेश पूजा
कबेला, इटली
(संक्षिप्त)
दिनांक ३१.८.१९९२



आत्मपरीक्षण करा
आणि शोधून काढा.
मी सुज्ञ आहेका?
''मी सुज्ञतेचा सारासार
विचार करून गोष्टी
करीत आहे का?''
प्रत्येक ठिकाणी
आत्मपरीक्षण करा.
''मी कुठे चुकत
तर नाहीं ना''
हे शोधत रहा.

श्री गणेश म्हणजेच अबोधितता हा गुरूचा मूलभूत कणा आहे. अनसूया फार एकनिष्ठ पत्नी होती. ती इतकी धार्मिक होती, स्वत:ला तिने इतकं वाहून घेतलं होतं की, ब्रह्मा, विष्णू, महेश यांच्या भार्यांना तिच्याबद्दल असूया वाटू लागली. त्यांच्या पत्नींना त्यांनी, ती खरोखरंच शीलवती स्त्री आहे का याबद्दल तिची परीक्षा घ्यायला सांगितले. ते तिथे साधूच्या वेषात आले, अनसूयेने त्यांचे स्वागत केले. त्यांच्यासाठी अन्न शिजवले. पण तू सर्व कपडे उतरविल्याशिवाय आम्ही अन्न खाणार नाही असे ते म्हणाले. तेव्हा, तिच्या शक्तीने तिने त्यांचे तीन तान्ह्या बालकांमध्ये रूपांतर केले. त्यानंतर त्यांच्या अबोधितेचे एकत्रीकरण करून त्यांना त्यांचे गुरुपद मिळाले. अशाप्रकारे आदिगुरू तयार झाले.

तुम्हाला तुमचं गुरुपद हवं असेल तर प्रथम अबोधितता पाहिजे. अबोधितता ही फार अस्पष्ट संज्ञा असल्यामुळे समजण्यास कठीण आहे. श्री गणेशांकडून आपल्याला अबोधिततेचे स्वरूप कळू शकेल. सर्वप्रथम त्यांना समयोचित सुज्ञता प्रदान केली आहे. आणि ते, ती आपल्यामध्ये घालतात. ते जेनेटिक्स सारखं आहे. आपलं वागणं आणि वंश जेनिटिक्स अनुवंशशास्त्र ठरवतं. जेनेटिक्सची निवड करणारे, व आपल्यामध्ये ती वापरणारे, ते आहेत. जेव्हां आपल्यामध्ये ते सुज्ञता घालतात तेव्हां, आपण सुज्ञ होतो. सुज्ञतेचा खरोखर एक जीन आहे. त्याचा कांही वंशामध्ये अभाव आहे. त्यांच्याकडे सुज्ञता नसते, स्वत:च्या विनाशासाठीच ते चुकीच्या गोष्टी करतात. स्वत:ला ते उच्च प्रतीचे समाजवादी, किंवा उच्च वंशाचे म्हणतात. पण त्यांच्यामध्ये सुज्ञता नसते. त्या पातळीपर्यंत न पोहोचलेल्या कांही वंशांमध्ये सुज्ञतेचा अभाव असतो. ही सुज्ञता आपल्याला एक प्रकारच्या स्वातंत्र्याची जाणीव देते. त्यामुळे, सर्व प्रकारच्या वाईट संवयी व अंमली पदार्थापासून आपण दूर राहतो. नग्नावस्थेकडे आपल्याला पाहवत नाही. ज्यांच्याकडे सुज्ञता आहे त्याला अशा प्रकारची जीवनपद्धती कधीच आवडणार नाही. विवाहबाह्य संबंधामध्ये आपण गुंतत नाही. आपण पूर्णपणे मध्यावर असलेलं, आणि धार्मिक ते सगळं स्वीकारतो. आपल्यामध्ये रुजवलेलं सुज्ञतेचं बीज वाढल्यावर, आपल्याला धार्मिक बनवितं. आपोआप आपणं धार्मिक बनतो. आपण ठार कुणाला करीत नाही, आक्रमण करीत नाही, इतरांचा छळ करीत नाही. इतरांची जागा, घर घेत नाही किंवा दुसऱ्याचे काहीही हिरावून घेत नाही. श्रीगणेशांकडून सुज्ञता येते, आत्मसाक्षात्कारासाठी ते आपल्याला पूर्णपणे तयार करतात.

आपल्या आत्मसाक्षात्काराच्या वेळी, निर्वाणाच्यावेळी ते आपल्याकडे लक्ष पुरवितात. कारण उत्सर्जनासारख्या इतर सर्व क्रिया, तुम्ही नव्या जगतात जात असताना, ते थांबवितात. एकदा मी १८ तास

एकदांही न उठता, एका जागी, बसले आहे. कुंडलिनीचं उत्थान होत असतांना या सर्व क्रिया थांबतात व तुमच्या मेंदूत ती सुज्ञता येते. एकदा ती सुज्ञता आली कीं, सर्व वाईट संवयी, चुकीची आसक्ती, सर्व अधार्मिक गोष्टी, गळून पडतात. तुमचं जेनेटिक्स बदलतं. सहजयोग्यांचे जीन साधारण सारखे असतील, इतर लोकांचे जेनेटिक्स वेगळं असेल, भारतीयांच जवळजवळ सारखं असतं कारण, सामान्यत: ते अतिशय सुज्ञ लोक असतात. पाश्चात्त्य देशांतील मुलं शाळेत गेल्यावर फार विध्वंसक गोष्टी करत होती, एकदां त्यांनी घाणेरड्या तळ्यांत उड्या मारल्या आणि त्यांना मलेरिया झाला. शाळेतून बाहेर पळून रस्त्यावर, नाहीतर दुकानांत गेली. सुज्ञ मुले फार सावधगिरीने वागतात आणि स्वत:च्या आयुष्याचं महत्त्व त्यांना माहीत असतं. त्यांचे पालक व इतरांना आपोआप ही मुलं मान देतात. त्यांना धर्म आपोआपच समजतो.

श्री गणेशांनी ख्रिस्तांचं रूप घेतलं, परमेश्वर म्हणून तुम्ही सर्वांनी त्यांचा स्वीकार केला. पाश्चात्त्य देशांमध्ये तुमचं गणेश–तत्त्व जास्त विकसित झालं नसल्याने, लोक अश्लील व बिभत्सतेकडे वळले. विवस्त्र स्त्रीविषयी त्यांच्यामध्ये असणारं आकर्षण त्यांना सुज्ञता नाही किंवा, त्यांच्यामध्ये गणेश नाहीत हेच दर्शवितं. ख्रिस्ताचे ते अनुयायी असले तरी, चर्चला जाणं म्हणजे फक्त तोंडदेखलंच आहे, आणि त्यांच्या जीवनात चर्च पावित्र्याचा, मांगल्याचा लवलेशही नसतो. सुज्ञता आल्याबरोबर तुम्हाला पावित्र्य, मांगल्य समजूं लागतं. मुलांना मूलत:च अबोधितता प्राप्त असल्याने, 'आम्हाला मुलांसारखं कर' असं गणेशांना सांगायला हवं, सर्व मुलं नव्हे. पण, ज्या मुलांमध्ये गणेशांनी सुज्ञता घातली आहे, अशी मुलं. अंतर्यामी शक्ती नसल्याने तुम्ही चुकू शकतां. तुम्हाला आंतमधून सुज्ञ व्हायला हवं. सहजयोगी कसे काय वेगळे आहेत, ते तुम्हाला दिसूं शकतं. त्यांची वर्तणूक, उभं राहणं, बोलणं, विचार, वेगळे असतात. पहिल्यांदा ते मद्य प्राशन करीत होते, धूम्रपान करीत होते, अंमली पदार्थांचे सेवन करीत होते, पण एकदम ते बदलले, त्यांच कारण श्री गणेशांनी त्यांच्यामध्ये सुज्ञता घातली आहे.

श्रीगणेशांचे चरित्र फार चित्तवेधक आहे. ते एक बालक आहेत. आणि आपल्या आईला पूर्णपणे समर्पित, दुसरा कोणताही देव त्यांना माहीत नाही. पण आपण तसे आहोत का? कांही सहजयोग्यांमध्ये प्रामाणिकपणाचा अभाव आहे. ते अजून कडेलाच आहेत. आणि त्यांना आणखी वर उठायचं आहे. सहजयोगाने त्यांना कितीतरी दिलेलं आहे. आपण सहजयोगाविषयी प्रामाणिक आहोत कां? सहजयोगासाठी आपण काय करतो हे तुम्हीच तपासून पहा. कांही सहजयोग्यांची सहजयोगावरच जबाबदारी पडते. गणेशाची कधीही आपल्या आईवर जबाबदारी नसते.

उदा. कोणी आजारी पडलं तर, सहजयोग तुम्हाला मदत करू शकतो. तुम्ही बरे व्हाल किंवा नाही, जर ते बरे झाले नाही तर, ते कुरकुर करतात आणि सहजयोग सोडून देतात. काय महत्त्वाचे आहे ते न जाणता लहानशा गोष्टीमुळे ते निघून जातात. दुसरी जबाबदारी होते, ते जेव्हां विवाह करतात त्यावेळी, "ही पत्नी मला आवडत नाही, जोडीदार सहजयोग करीत नाही, मी काय करू?" तुम्ही स्वत:च तुमचे प्रश्न सोडवा. ते करण्याची शक्ती तुमच्याकडे आहे. संयम ठेवा आणि तुम्हीच ते सोडवा. फक्त सहजयोगीच सहजयोगाला त्रास देऊ शकतात, जोपर्यंत एखादा सहजयोगी अयोग्य वर्तन करीत नाही, तोपर्यंत सहजयोगाला कोणीही हातसुद्धा लावू शकत नाही. त्यांनी चमत्कार पाहिले आहेत. फायदे पाहिले आहेत, मदत झालेली पाहिली आहे, पण नसेल इच्छा तर त्यांनी तो सोडावा. नाहीतरी स्वर्गात फार थोडी जागा आहे. आणि अशा अर्धवट लोकांसाठी जागा नाहीच.

नुसती बाहेरून श्रीगणेशांची उपासना, करू नये. तुमच्या आंतमध्ये काय आलंय तो महत्त्वाचा मुद्दा आहे. श्रीगणेशाचं तुम्ही त्याच भक्तीने, समर्पणाने अनुसरण करतां का? श्री गणेशांच्या धर्तीवर तुम्हाला घडविले आहे.

निष्कलंक गर्भधारणेने श्री गणेशांना घडविले होते. तुम्हालाही त्याच प्रकारे बनविले आहे. तुमची कुंडलिनी चढविली होती. तुम्हाला आत्मसाक्षात्कार दिला होता. तुम्हाला तुमचा दुसरा जन्म मिळाला, पित्याशिवाय या सर्व गोष्टी तुमच्या बाबतीत घडल्या. तुमच्यामध्ये कांहीतरी असलं पाहिजे. त्याशिवाय मी तुम्हाला घडवू शकले नसते. तुमच्या आत्मसाक्षात्कारांसाठी तुम्ही परिपक्व होता आणि, खरोखरच त्याला शोधत होता. सहजयोगी बनण्याची तुमची इच्छा होती म्हणून हे घटित झाले. ज्यावेळी वाढ होत असते तेव्हां, तुम्ही निरीक्षण केलं पाहिजे. आणि आपण किती प्रामाणिकपणे, किती समर्पणाने आपण सहजयोग करीत आहोत ते पाहिलं पाहिजे.

काल वादळ होतं, तुम्ही गाणी म्हणूं लागल्यावर वादळ थांबलं. केवळ गाण्याला किती शक्ती असते, हे दाखविण्यासाठी हे झालं. अशा गोष्टी घडल्या नाहीत तर, या गाण्यांना इतकी शक्ती असते हे तुम्हाला कसं कळणार? ही गाणी मंत्र आहेत. मी कांही सूचना दिल्या नाहीत, तुम्ही स्वत:हून गाऊ लागलात. जर प्रत्येक वेळी मला सुचवायचं असेल तर, तुमची शक्ती तुम्ही कधी वापरणार? ही श्रीगणेशाची क्लृप्ती आहे. तुमच्यासाठी खरे परीक्षक ते आहेत. जेव्हा तुम्हाला बाहेर टाकलं जातं, त्यावेळी परत येणं फार कठीण असतं. जरी तुम्ही परत आलातं तरी, स्वत:बद्दल तुम्हाला शंका असते आणि इतरही तुमच्याविषयी संशयित असतात. ही न्यायनिवाड्याची वेळ आहे, हे तुम्ही जाणलं पाहिजे, आत्मपरीक्षण करा आणि शोधून काढा. मी सुज्ञ आहे का?''मी सुज्ञतेचा सारासार विचार करून गोष्टी करीत आहे का?'' प्रत्येक ठिकाणी आत्मपरीक्षण करा. ''मी कुठे चुकत तर नाहीं ना'' हे शोधत रहा.

तुमचं प्रेम तुम्हाला व्यक्त करायचं आहे. पण इथे प्रेम म्हणजे आसक्ती नाही. पण अलिप्तता आहे. तिथे ते जास्तीत जास्त वाढू शकतं. आणि ही सर्व जबाबदारी पेलूं शकतं, इतर सहजयोग्यांवर टीका करणारे लोक आहेत. अत्यंत खालच्या दर्जाच्या सहजयोग्याची ती खूण आहे. कारण स्वत:मध्ये काय चूक आहे ते, तो पाहत नाही. दुसऱ्या प्रकारचे सहजयोगी आहेत, ज्यांना ते गणांसारखे आहेत याचं आकलन झालेलं नाही. गण अत्यंत जलद असतात. श्रीगणेश गण निर्माण करतात. पहिल्यांदा ते छातीच्या स्टर्नम या अस्थीमध्ये असतात. मग ते सर्व शरीरात जातात. जेव्हां मध्य हृदय, आईचं स्थान, थोडसे व्हायब्रेट होऊ लागते, स्पंदन पावू लागते, तेव्हा ते दक्ष होतात. आपल्याला दक्ष असलं पाहिजे, ते फार महत्त्वाचं आहे. तुमच्या वयाच्या बारा वर्षापर्यंत हे गण स्टर्नम अस्थीत राहतात मग ते पूर्ण शरीरामध्ये पसरतात. शत्रूला तोंड देण्यासाठी परिपक्व होईपर्यंत ते असतात. कोणत्या प्रकारचे शत्रू आहेत,ते त्यांना माहीत असतं आणि कोणी कोणाला तोंड द्यायचे हे ते ठरवतात, पण ते सतत आईच्या घरात बसून राहत नाहीत. तुम्हीही लोकांकडे गेलं पाहिजे, स्वत:मध्ये कांही भीती न ठेवतां, तुम्हाला सर्व सिद्धतेने गेलं पाहिजे, त्यांच्याशी लढा केला पाहिजे, रडत, अश्रू पुसत घरी बसतां कामा नये. बुद्धांनी हेच केले. म्हणून त्यांना मैत्रेय म्हणतात.

तुम्ही जेव्हां गुरुपदासाठी मागणी केली, त्यावेळी तुम्ही अडचणीत येणार, हे तुम्हाला माहीत नव्हतं. गुरू घरी बसत नाही; तो बाहेर जातो, सर्व प्रकारच्या लोकांना भेटतो, त्यांना सहजयोगाविषयी सांगतो. घाबरू नका, तुम्हाला समाजांत रहावयाचें आहे. तुमच्या स्वत:च्या प्रश्नामध्ये गुंतून रहावयाचे नाही, किंवा नुसता सहजयोग्यांच्या किंवा सहजयोगाविषयक प्रश्नांत अडकून रहावयाचे नाही तर बाहेर जाऊन इतर लोकांना भेटायचं आहे, त्यांना सहजयोगाबद्दल सांगायचे आहे. वाटल्यास माझा फोटो असलेले बॅचेस लावा, म्हणजे लोक विचारतील, आणि तुम्ही त्याविषयी त्यांच्याशी बोलू शकाल. तुम्हाला कशाचाही त्याग करायला नको. वेगवेगळ्या जागांवर जाऊन तुम्ही त्यांच्याशी संपर्क साधला पाहिजे. तुम्ही काय करता, त्याविषयी लिहिलं पाहिजे. आजूबाजूला काय चाललं आहे, ते तुम्हाला कळलं पाहिजे, बातम्या वाचा, टी.व्ही. बघा, कारण आंता तुम्ही परिपक्व झाला आहात. त्या आधी नाही. तसे कराल तर टी.व्ही.वाल्या लोकांसारखे तुम्हीही वेडे व्हाल. अलिप्त मनाने तुम्ही टी.व्ही. पाहिलात तर, ताबडतोब तुम्हाला मुद्दा काय तो कळेल, नाहीतर तुम्ही घरांत बसून माताजींसाठी रडत रहाल. गणेश या गणांना

शक्ती देतात ते लढतात. म्हणून त्यांना गणपती म्हणतात. तुमच्या देशाचे कांही नियम विचित्र आहेत, त्याविषयी तुम्ही लिहिलं पाहिजे, निश्चयपूर्वक स्वत:चं सांगणं मांडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जोपर्यंत तुम्ही हे करत नाही, तोपर्यंत सहजयोगांत नवीन कोणी येणार नाही. कदाचित त्यांच्यामधून तुम्हाला खूप महान लोक मिळतील. हे खोटे गुरू या मोठ्या लोकांना फार मोठी पत्रं लिहितात, त्यानंतर त्यांची मुलाखत मिळवितात, मग त्या लोकांना जाऊन भेटतात, स्वत:ची पुस्तकं वगैरे दाखवितात. म्हणून गणेशाचे गण म्हणून तुम्हाला हे विशेष काम केलं पाहिजे. तुम्हाला संगीत सभा घेता येईल, ती जरी "पॉप" स्टाईलची असली तरी संदेश स्पष्ट हवा. त्यासाठी आपल्याला पूर्णत: परिपक्व झालेले लोक हवेत.

आपण बुद्धिमान आहोत म्हणून हे समजू शकत नाही. असेही आपण म्हणतां कामा नये. तयारी करा. आपण सेमिनार किंवा क्लासेस देखील काढू शकतो. तिथे ह्याची चर्चा होईल. पूजेच्या वेळी एक प्रकारची परिषद किंवा चर्चा होऊ शकते. आतां वेळ आली आहे. आणि तुम्हाला पुढे आलं पाहिजे, आत्मसाक्षात्कार घेतल्याशिवाय तुमच्या अनुवंशिकतेचे प्रश्न सुटणार नाहीत. वैयक्तिक प्रश्नांच्या बाहेर या सर्व गोष्टींविषयी अलिप्त दृष्टिकोण पाहिजे. कुठलीही आसक्ती नको. तरच तुम्ही स्वतंत्र व्हाल. याचा अर्थ असा नाही की तुमचं कर्तव्य करू नका, देखभाल करू नका. प्रत्येकाला प्रेम द्या, त्याची कदर करा. जर तुमचं व्यक्तिमत्त्व परिपक्व असेल आणि तुम्ही अर्थपूर्ण दृष्टीने पहात असाल, तर तुम्ही म्हणाल "मला सहजयोग केला पाहिजे, ते माझं मुख्य कार्य आहे, " तुम्हाला समजलं पाहिजे की, तुम्ही सर्वसामान्य दिसला तरी,देवाने तुम्हाला निवडलं आहे. तुम्ही सहजयोगाचं कार्य केलं नाही, तर दोष कोणाला येईल? मला तुमच्याकडून पैसा किंवा इतर काही नको. अर्थात पैसा जिथे लागतो, तिथे तुम्ही कांहीही करून पैशाची मदतही केली पाहिजे. लोक शर्यतीवर दारूच्या गुत्यावर पैसे लावतात. दुसरी गोष्ट, लोक विचारतात, हे एवढं महाग कां, असं कां नि तसं कां? सहजयोगांत प्रत्येकाला अकाऊंट्स कळतात. आणि येतात. काहीही लपवलेल नसतं. पैसा कुठे जातो वगैरे. मला सहजयोगाची गरज नाही. तुम्हालाच सहजयोगाची गरज आहे.

मी कोण आहे माहीत आहे कां तुम्हाला? गणेशांना माहीत आहे. एकदा, त्यांचे वडील म्हणाले पृथ्वीभोवती जो कोणी प्रथम प्रदक्षिणा घालेल त्या व्यक्तीला मी बक्षीस देईन. त्याचा दुसरा भाऊ कार्तिकेय, त्याचे वाहन मोर. गणपतीच वाहन उंदीर. त्यांनी विचार केला, माझ्या आईपेक्षां कोण महान आहे? ती सर्वात महान आहे. म्हणून श्रीगणेशांनी तिलाच प्रदक्षिणा घातली. मी महामाया आहे, मला तुम्ही पूर्णपणे जाणूं शकत नाही. कारण नाहीतर, तुम्ही इथे बसणार नाही. पण तसं असलं तरी गणेशांनी त्यांच्या आईला समजून घेण्याचा प्रयत्न केला, तसा प्रयत्न करा. नि:शंकपणे ते कठीण आहे, पण तरीही प्रयत्न करा. ही तुमच्यापुढे बसलेली शक्ती आहे. आपण कसे वागतो, बोलतो, कशाप्रकारे निर्णय घेतो, ते सर्व कसे अयोग्य आहे हे जर तुमच्या मेंदूत शिरलं नाही तर त्याचा अर्थ कुंडलिनी तिथे आली नाही. लोकांना एका व्यक्तीचीही कुंडलिनी वर चढवता येत नव्हती, आतां मीच नुसती कुंडलिनी जागृत करते असे नाही तर तुम्हीसुद्धा ते करू शकता.

मी मानवासारखी वागते, हसते, चुटके सांगते, पण त्याचा अर्थ तुम्ही स्वातंत्र्य घ्या असा नाही. श्रीगणेश हे एक सर्वात जास्त कडक देव आहेत. ख्रिस्ताने सूचना दिली आहे,

"माझ्याविरुद्ध कांहीही मी सहन करेन पण, होली घोस्ट (आदिशक्ती) विरुद्ध नाही." लोकांना शिक्षा मिळते. तुम्हाला जो कोणी त्रास देण्याचा प्रयत्न करेल, त्याला त्रास होईल, पण तुमच्या शक्त्यांवरचा तुमचा विश्वास कुठे दिसत नाही. अंधविश्वास नव्हे, विश्वास, प्रकाशित विश्वास जर असेल तर, तुमच्या रक्षणासाठीं आणि कल्याणासाठीं सर्व कांहीं घटित होईल.

तुमच्याकडे प्रचंड शक्त्या आहेत हे तुम्हाला कळलं पाहिजे, नुसती प्रार्थना करा, "श्रीमाताजी, मला ही व्यक्ती बरी व्हायला पाहिजे " त्या व्यक्तीला तुम्हाला हात लावायची गरज नाही, तो तुमचा विश्वास आहे. इतर सहजयोगी असतांना एखाद्या सहजयोगिनीला त्रास का व्हावा?मी आतां कोणाला बरं का करावं? तुमच्या प्रार्थना देखील इतक्या शक्तिशाली आहेत, नुसती प्रार्थना करा.

तुमचा उदारपणा तुम्ही प्रगट करा. आणि पहा, लक्ष्मी वाहू लागते, पण प्रत्येक बारीकसारीक गोष्ट तुम्ही मोजली तर संपलंच. श्रीगणेशांना माहीत होतं त्याप्रमाणे तुमची शक्ती नीटपणे जाणा. मानवी असूनही तुम्ही जास्त चांगल नियमन करू शकता.

श्रीगणेशांची दुसरी गुणवत्ता म्हणजे ते संतुष्ट व्यक्ती आहेत. ते मोदक खातात, काहीतरी भरपूर त्यामध्ये सर्व सुकामेवा असलेलं खातात. खायला कांही देऊन तुम्ही त्यांना प्रसन्न करून घेऊ शकता. माझं त्याउलट आहे. मी जास्त खाऊ शकत नाही, आणि तुम्हाला मला द्यायचं असत. जे काही तुम्ही खाता त्यावेळी त्यांचा विचार करा. तुम्हाला कधीच अन्नाची टंचाई भासणार नाही.इतरांसाठी तुम्ही परीक्षेच्या मैदानात आहांत, तुमच्या शक्त्या वापरा. पण तुमचं चित्त दुसरीकडे असेल तर ते शुद्ध नाही. श्रीगणेश आणि मी यांच्यात चित्त ठेवा, सर्व कांही कार्यान्वित होईल. तुमच्यासाठी हे गण इथे आहेत सारं कार्यान्वित करीत आहेत. तुमचं चित्त अशा प्रकारे ठेवा की तुम्ही जाणाल आणि दक्ष रहाल. तर, तुमच्या प्रभुत्वाचा उपयोग करा. अजून तुम्ही घरीच बसला आहात, माझे वडील आजारी आहेत, असं म्हणत. मग जा आणि त्यांना बरं करा. छोट्या गोष्टीत गुंतण्यापेक्षा वर उठा.

ईश्वर तुम्हाला आशीर्वाद देवो.

●●●

## कुंडलिनी

परमेश्वराची इच्छा किंवा त्याची इच्छाशक्ती ही आपल्या डाव्या नाडीतून वाहात असते. त्या इच्छाशक्तीचा थोडासा भाग कुंडलिनी आहे. म्हणजेच परमेश्वराने आपली स्वत:ची इच्छाच आपल्यामध्ये या त्रिकोणाकार अस्थीमध्ये ठेवली आहे. मनुष्याचा पिंड तयार झाल्यावर जीवाला पुरवण्यांत आलेली ही शक्ती आहे. म्हणून इंगजीमध्ये तिला रेसिड्यूअल एनर्जी (Residual Energy) असे म्हणतात. पण ही शुद्ध शक्ती आहे तसेच ही शुद्ध इच्छाशक्ती सुद्धा आहे. ही इच्छा संपूर्ण परमेश्वराची इच्छा असल्यामुळे तिच्यात आपल्या कोणत्याही इच्छेचा परिणाम न झाल्यामुळे ती अत्यंत शुद्ध आहे आणि त्या शुद्धतेत ती बसली आहे. ती त्रिकोणाकार अस्थीमधील शक्ती जी बाहेरून त्रिकोणाकार दिसते. परंतु आतून ती साडेतीन वेटोळे घालून कां आहे त्याचे मोठे गणित आहे.

तुमची कुंडलिनी सहज जागृत झाली केवळ तुमच्या आईच्या प्रेमामुळे, करुणेमुळे. हीच करुणा, हेच प्रेम तुमच्या कुंडलिनी शक्तीचे पोषण करणार आहे.

तुम्ही शक्तिमान आहात, भित्रे व्हाल तर तुमची कुंडलिनी वर जाणार नाही, जे लोक भित्रे आहेत त्यांची कुंडलिनी वर चढत नाही. खरा सहजयोगी कशालाच भीत नाही. कारण त्याला ठाऊक आहे की गण व देवदूत त्यांचेबरोबर आहेत. ही भीती दूर गेली की तुमच्यातील कपट कावेबाज वृती व द्वेषबुद्धी निघून जाईल या सर्वांमुळे कुंडलिनीचे उत्थापन व्यवस्थित होईल.

दुसरे महत्त्वाचे कुंडलिनीला अडथळा येण्याचे कारण तुमचा -अहंकार - हा भयंकर आहे. तुम्ही जर ख्रिस्तांचे अनुकरण करता तर तुमच्यात अहंकार कसा येतो? क्षमा वृत्ती सहज यावी रागाचा लवलेशही नसावा कारण तुम्ही शक्तिमान आहात.

कुंडलिनी ही निर्व्याज आहे. ती कसली भरपाई मागत नाही. करुणामय, मुलायम असा आपल्या निर्मिलेल्या या प्रेमाचा (कुंडलिनीचा) झरा, ही आपली शक्ती तशीच वाहू द्या. कारण तिने दिलेला साक्षात्कार हा स्वत:च्या उद्धाराबरोबर सर्व जगाकरिता आहे.

जेव्हां सहस्रार उघडते तेव्हां कुंडलिनी शक्तीचे उत्थापन होऊन दैवी शक्तीशी तिचा संयोग होतो आणि ती सदासर्वकाळ तुमच्यात प्रवाहित होते, त्यामुळे तुम्हाला निर्विकल्प अवस्था प्राप्त होते. ही दैवी शक्ती सहस्रारातून तुमच्यामध्ये येत असल्यामुळे प्रत्येकाने हे लक्षात घेतले पाहिजे की सहस्रार स्वच्छ असले पाहिजे. ज्यायोगे दैवी शक्तीचास्रोत कोठल्याही अडथळ्याशिवाय तुमच्यात प्रवेश करेल. मग अशाप्रकारे तुम्हाला संपूर्ण आत्मसाक्षात्कार मिळतो.

प्राचीन काळापासून भारतात लोकांनी कुंडलिनी विषयी सांगितले की, कुंडलिनी आपल्यामधील आदिशक्तीचे प्रतिबिंब आहे. प्रत्येकामध्ये तिचे वास्तव्य आहे. तेव्हां ही आदिशक्ती शुद्ध प्रेम, करुणामय अशी शक्ती आहे हे जाणले पाहिजे. तिच्या अंत:करणात शुद्ध प्रेमाशिवाय काही नाही व ते पवित्र प्रेम फार प्रबल आहे.

तुम्हा सर्वांमध्ये या शक्त्या आहेत. कुंडलिनी ही फार भयानक गोष्ट आहे असं वर्णन करणारी पुस्तके आहेत. ते पूर्णपणे निरर्थक आहे. मी अनेक देशांत गेले आहे आणि अनेक लोकांना साक्षात्कार दिला आहे. आणि त्यांना त्रास झाल्याचे कोणतेही चिन्ह नाही, त्याउलट प्रत्येक प्रकारे ते सुधारले आहेत. रात्रभरात लोकांनी ड्रग्ज, दारू, वाईट सवयी सोडून दिल्या. लोक रोगमुक्त झालेत. तुमची स्वत:ची कुंडलिनी ते कार्यान्वित करते.

कुंडलिनी तुमची आई आहे. तुमची एकुलती एक खरी आई आहे.आणि तिला तुमच्याबद्दल सारी माहिती आहे. ते सगळे तिच्यामध्ये मुद्रित झालेले आहे. ती साडेतीन वेटोळ्यामध्ये तुमच्यामध्ये आहे. जेव्हां ती उत्थान पावते तेव्हां कदाचित ती थोडीशी उष्णता देईल, कारण तिला कराव्या लागणाऱ्या थोड्याशा धडपडीमुळे असे होते.

एकदा का ही कुंडलिनी उत्थान पावली की ती सहा चक्रामधून जाते, टाळूच्या जागी छेदन करते, हाच बाटीस्मा अर्थात द्विज होण्याचा खरा आविष्कार असतो. त्यानंतर हा आत्मा प्रकाश बनून आपल्या चित्तामध्ये येतो आणि आपल्या नसांना नवी जाणीव मिळते, ज्यामुळे आपण सामूहिक चेतनेमध्ये उतरतो.

आता ही कुंडलिनी आतापर्यंत प्रतिक्षेत होती आणि आरामस्थितीत होती, ती जागृत झाली आणि म्हणूनच सर्वत्र वसंत बहरला आहे. अशावेळी जागृत झालेली कुंडलिनी असा प्रकाश देईल की सर्व विश्वाला पूर्णत्व प्राप्त होईल.


---

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥

# श्रीमाताजी जन्मस्थान, छिंदवाडा









# छिंदवाडा पूजा-सेमिनार, दिनांक १९,२० व २१ मार्च २००६





